## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.

**'STARS' प्रकल्पांतर्गत**

# संकलित मूल्यमापन 2 : 2023-24 – सराव प्रश्नपत्रिका

## इयत्ता – पाचवी : विषय – परिसर अभ्यास : भाग – 1

## शिक्षकांसाठी सूचना, प्रात्यक्षिक/तोंडी प्रश्न आणि उत्तरसूची

**भूमिका व दृष्टिकोनातील बदल :**

राज्यस्तरावरून 'STARS' प्रकल्पांतर्गत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात पायाभूत चाचणी, संकलित चाचणी - १ व संकलित चाचणी - २ अशा तीन चाचण्या घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. इयत्ता तिसरी ते आठवी पर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरूप अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही, याची तपासणी या चाचण्यांद्वारे करता येईल.

या चाचण्यांद्वारे विद्यार्थी संपादणुकीचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करून गुणवत्ता समृद्धीसाठी आवश्यक उपाययोजना करणे तसेच शाळाधारित मूल्यांकन प्रक्रियेचे बळकटीकरण करणे हा उद्देश आहे.

यानुसार राज्यस्तरावरून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती आधारित इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची संकलित चाचणी - २ घेण्यात येत आहे. सदर चाचणीचा मुख्य उद्देश, विद्यार्थ्यांनी अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केलेल्या आहेत, हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.

**चाचणीचे स्वरूप :**

- संकलित चाचणी - २ ही अध्ययन निष्पत्तीवर आधारित असून ती इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व लेखी स्वरूपाची आहे.
- संकलित चाचणी - २ विकसित करताना त्या इयत्तेतील द्वितीय सत्रातील अध्ययन निष्पत्ती विचारात घेतल्या आहेत.

| इयत्ता | तोंडी/प्रात्यक्षिक | लेखी | एकूण |
|---|---|---|---|
| तिसरी | 10 | 30 | **40** |
| चौथी | 10 | 30 | **40** |
| पाचवी | 10 | 40 | **50** |

| इयत्ता | तोंडी/प्रात्यक्षिक | लेखी | एकूण |
|---|---|---|---|
| सहावी | 10 | 40 | **50** |
| सातवी | 10 | 50 | **60** |
| आठवी | 10 | 50 | **60** |

**चाचणी नियोजनकरिता सूचना :**

- संकलित चाचणी - २ चे पूर्वनियोजन, प्रत्यक्ष चाचणी घेणे आणि माहितीचे संकलन अशा तीन टप्प्यांचे नियोजन शिक्षकांनी इयत्तानिहाय व विषयनिहाय करावे.
- प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेसाठी लागणारे साहित्य शिक्षकांनी चाचणी सुरू करण्यापूर्वी तयार ठेवावे.
- विद्यार्थी संख्येनुसार वेळेचे नियोजन करावे.
- प्रात्यक्षिक व तोंडी व लेखी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा.
- विद्यार्थ्यांना प्रश्नाचे आकलन न झाल्यास शिक्षकांनी त्यांना प्रश्न समजण्यासाठी साहाय्य करावे; मात्र उत्तराचा संकेत देऊ नये.
- संबंधित वर्गाच्या परिसर अभ्यास : भाग - १ विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनीच ही चाचणी विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावी.
- चाचणी तपासताना प्रश्नांचे गुण पूर्णांकात द्यावे. अर्धा गुण देऊ नये.
- प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेसाठी विचारावयाच्या प्रश्नांचा समावेश मूळ प्रश्नपत्रिकेत करण्यात आलेला आहे.
- प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेची उत्तरे व कृतीसाठी वेगळा कागद वापरून त्यात विद्यार्थ्यांना आपले प्रतिसाद नोंदवण्यास सांगावे.
- सदर तोंडी चाचणीचे प्रश्न नमुनात्मक आहे. शिक्षक त्याच अध्ययन निष्पत्तीवरील इतर प्रश्न विद्यार्थ्यांना विचारू शकतात.

**चाचणीनंतर :**

१) चाचणीची उत्तरपत्रिका तपासल्यानंतर विद्यार्थ्यांच्या गुणांची नोंद गुणनोंदणी तक्त्यात करावी.

२) गुणनोंदणी तक्त्यातील गुणांचे विश्लेषण करावे.



३) ज्या क्षेत्रांतील अध्ययन निष्पत्तीमध्ये विद्यार्थी मागे आढळतील त्या विद्यार्थ्यांसाठी गरजेनुसार कृती कार्यक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी करावी.

४) ज्या अध्ययन निष्पत्तीमधील विद्यार्थ्यांची संपादणूक कमी आढळेल त्या घटकांचा पुर्नअध्यापन, सराव व उजळणी करून घ्यावी.

## उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना

**इयत्ता – पाचवी : विषय – परिसर अभ्यास : भाग 1**

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| 6 | 24 | 30 |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| | **तोंडी चाचणी** | | |
| प्र. 1) | **चिक्कीमध्ये असणारे विविध अन्नघटक सांगा.** | 05.95A.05 | 1 |
| | चिक्की : कर्बोदके, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, लोह | | |
| प्र. 2) | **खालीलपैकी लोणच्यामध्ये परिरक्षकाचे काम न करणारा पदार्थ कोणता ते सांगा.**<br>**कैरी, तेल, मीठ, हळद, साखर** | 05.95A.05 | 1 |
| | कैरी | | |
| प्र. 3) | **ठिबक सिंचन पद्धतीचा फायदा कोणता?** | 05.95A.02 | 1 |
| | पाण्याची बचत, बाष्पीभवनाने पाणी वाया जात नाही. | | |
| प्र. 4) | **पारंपरिक वेशभूषा स्पर्धेसाठी तुम्ही कोणत्या कपड्यांची निवड कराल ते सांगा.** | 05.95A.02 | 1 |
| | पारंपरिक वेशभूषा स्पर्धेसाठी कपड्यांची निवड– मुक्तोत्तरी. | | |
| प्र. 5) | **सायकलचा वापर का करावा? यामागील दोन कारणे सांगा.** | 05.95A.18 | 2 |
| | सायकल – शरीराला व्यायाम, कार्यक्षमता वाढते, प्रदूषण होत नाही. | | |
| | **लेखी चाचणी** | | |
| प्र. 6) | **पुढील प्रश्नांची उत्तरे एका शब्दात लिहा.** | | **5** |
| | 1) एम. एस. स्वामिनाथन | 05.95A.05 | 1 |
| | 2) वाळवणे | 05.95A.05 | 1 |
| | 3) रातांधळेपणा | 05.95A.04 | 1 |
| | 4) शिडाचे गलबत | 05.95A.02 | 1 |
| | 5) चूक | 05.95A.02 | 1 |
| प्र. 7) | **पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.** | - | **10** |
| | **अ)** कारखान्यांच्या सांडपाण्यात विषारी पदार्थ असल्याने जलस्रोतांचे प्रदूषण होऊन ते जलचरांना घातक ठरते, पिण्यासाठी/इतर कोणत्याही कामांसाठी वापरता येत नाही. | 05.95A.10 | 2 |
| | **ब)** देवराईमधील एकही झाड तोडले जात नाही, वनस्पती व प्राण्यांचे रक्षण होते. | 05.95A.10 | 2 |
| | **क)** लसीकरणामुळे विविध रोगांविरुद्ध प्रतिकार क्षमता विकसित होते, म्हणून नवजात बालकांना क्षय, घटसर्प, पोलिओ, धनुर्वात, डांग्या खोकला या रोगांविरुद्ध लसी देण्यात येतात. | 05.95A.10 | 2 |
| | **ड)** स्थायू व वायू पदार्थांच्या कणांची रचना दाखवणाऱ्या २ आकृत्या.<br>  | 05.95A.05 | 2 |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| | **इ)** 1) बोलण्याआधी विचार करून आवश्यक तेवढेच बोलीन.<br>2) साचीला विनंती करून तिच्याकडून चित्रकला शिकेन. | **05.95A.05** | 2 |
| **प्र. 8)** | **पुढील प्रश्न सोडवा.** | **-** | **9** |
| | **अ)** 1) श्वसनसंस्था | **05.95A.01** | 1 |
| | 2) नाक, श्वासनलिका, फुफ्फुसे, श्वासपटल | | 1 |
| | 3) फुफ्फुसातील वायूकोशात हवेतून आणलेला ऑक्सिजन बारीक रक्तवाहिन्यांत शोषला जातो, त्याचवेळी शरीरातून आलेल्या रक्तातील कार्बनडाय ऑक्साईड वायूकोशात शोषला जातो. | | 1 |
| | **ब)** फरक : तिच्यापेक्षा माझी उंची, वजन जास्त आहे. तिला ठरावीक शब्द, एखादे वाक्य बोलता येते, मला भरपूर बोलता येते. तिला भराभर चालता/धावता येत नाही, मला जमते. | **05.95A.01** | 3 |
| | **क)** 1) गुटखा, तंबाखू, विडी, सिगारेट, मद्य हे घातक पदार्थ सेवन करू नयेत. | **05.95A.10** | 1 |
| | 2) श्वसनसंस्था, चेतासंस्था, यकृत, मूत्रपिंडे यांची कार्यक्षमता कमी होते. तोंडाचा, फुफ्फुसाचा कर्करोग होण्याची शक्यता वाढते. | | 2 |